
# पंढरपूर

दि. ३१ जानेवारी ते १ आणि २ फेब्रुवारी २०१४




## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

## अध्यक्षीय भाषण

## श्री. अरुण काकडे

# श्री. अरुण काकडे यांचा परिचय



महाराष्ट्रातील प्रायोगिक नाट्यचळवळीत साठ वर्षे **सक्रीय** सहभाग असलेले, 'प्रायोगिक नाटक' हाच एकमेव जीवित हेतू मानणारे एक झपाटलेले व्यक्तिमत्व म्हणजे अरुण काकडे.

नाट्यजगतात अरुण काकडे हे त्यांच्यावरील प्रेमामुळे 'काकडे काका' या नावाने ओळखले जातात. 'रंगायन' (सन १९५६-१९७०) आणि 'आविष्कार' (१९७१ ते आजतागायत) अशा दोन प्रायोगिक नाट्यसंस्था यशस्वीपणे चालविणारे 'काकडे काका' म्हणूनच, प्रायोगिक नाट्य चळवळ चालविणारी 'एक सैनिकी फौज' **'One Man Army'** आहेत असे म्हटले तरवावगे ठरु नये.

स्वतःत दडलेल्या अभिनेत्याला स्वेच्छापूर्वक रंगमंचावरील झगमगाटापासून दूर ठेऊन प्रायोगिक नाटकाच्या अस्तित्वासाठी, भरणपोषणासाठी, वृद्धिसाठी आणि संशोधनासाठी रंगमंचाच्या पडद्यामागे राहून काकडे काकांनी सातत्याने काम केले.

सृजनाच्या अपूर्व नवनवोन्मेषांना, कल्पनांना आणि विचारांना अभिव्यक्त करण्यासाठी एक पवित्र असा रंगमंच हवाया प्रबळ इच्छेपोटी विजय तेंडुलकर, अरविंद आणि सुलभा देशपांडे यांच्या बरोबर १९७१ साली त्यांनी 'आविष्कार' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. 'आविष्कार' ही 'मातृनाट्य संस्था' म्हणून ओळखली जाते. काकडे काका याच आघाडीवरुन समांतर नाट्य चळवळीचे नेतृत्व करीत आहेत.

पन्नासच्या दशकपूर्वार्धात पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये शिकत असताना प्रा. भालबा केळकरयांच्या रुपाने काकडे काकांना सुयोग्य शिक्षक लाभला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काकांनी रंगभूमी संदर्भातील कामाचे पहिले धडे गिरविले. यातूनच काकांच्या कार्याचा पाया घातला गेला आणि रंगभूमीच्या संदर्भातील श्रद्धाही सबळ बनल्या.

साठ वर्षे रंगभूमीशी संबंधीत असूनही काका अकारण भूतकाळात न रमता वर्तमान काळात जगत असतात आणि नेहमी भविष्यकाळाचा विचार करीत असतात.

भारतातील प्रायोगिक रंगभूमीच्या प्रवासातील मैलाचा दगड मानली जाणारी 'रंगायन' नाट्यसंस्था स्थापन करणारे जे काही समविचारी साठीच्या दशक पूर्वार्धात एकत्र आले होते त्यापैकी 'काका' एक होते.

सर्व ललित कलावंतांच्या प्रयोगशीलतेला वाव देणारी 'छबिलदास चळवळ' सत्तरीच्या दशकमध्यात जन्माला आली. या चळवळीच्या संयोजनात आणि संगोपनात 'काका' अठरा वर्षे सहभागी होते.

१९७४ ते १९९२ या कालावधीत काकांच्या भक्कम आधारावर आणि मार्गदर्शनाखाली **५०** पेक्षा अधिक प्रयोगिक नाट्यसंस्थांनी छबिलदासच्या रंगमंचावर २००० पेक्षा जास्त नाट्यकृतींचे सादरीकरण केले.

मराठी रंगभूमीच्या इतिहासात २०० हून अधिक नाविन्यपूर्ण कल्पक प्रायोगिक

नाट्यकृतींची निर्मिती व त्यांचे ७००० हून जास्त प्रयोग करणारे काकडे काका एकमेव व्यक्तिमत्व आहेत. “Creativity, if rightly pampered and moulded, can create wonders!” यावर काकांचा ठाम विश्वास आहे. संगीत नाट्य आणि पपेट्रीया क्षेत्रातील तज्ञांच्यासहभाग व मार्गदर्शनाखाली आविष्कारने आतापर्यंत तरुण कलावंतांसाठी ६३ हून अधिक नाट्य प्रशिक्षण शिबिरे तसेच मुलांसाठी ६७ शिबिरे आयोजीत केली आहेत.
संशोधन व प्रयोगशीलतेने काकांनी लहान मुलांसाठी ३५ हून अधिक नाटके, पपेट शोज़, नृत्यनाटिकांची निर्मिती केली. दरवर्षी बदलणाऱ्या ३ ते ३० वयोगटातील जवळपास ५० कलावंतांचा समूह सादर करीत असलेल्या दुर्गा झाली गौरी या नृत्यनाटिकेला गेल्या ३० वर्षांपासून प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार चिं. त्र्यं. खानोलकर, शंकर शेष, सत्यदेव दुबे यांसारख्या प्रस्थापित नाटककारांबरोबरच चेतन दातार, चं. प्र. देशपांडे, इरावतीकर्णिक , सुषमा देशपांडे यांसारख्या नवोदित लेखकांना प्रोतसाहन देऊन त्यांच्या नाटकांची निर्मिती करण्यातही काकांनी पुढाकार घेतला.

काकांनी नाट्य दिग्दर्शनात विविध प्रयोग करण्यासाठी ज्यांना प्रोत्साहित केले अशा दिग्दर्शकांमध्ये पं. सत्यदेव दुबे, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, जयदेव हट्टंगडी, चेतन दातार, नीलकांती पाटेकर, प्रतिमा कुलकर्णी, अजित भगत, विजय केंकरे, दीपक राजाध्यक्ष, गिरीश पतके, विश्वास सोहोनी आणि अनेकांचा समावेश होतो.

काकांनी महेश एलकुंचवारांच्या वाडा चिरेबंदी, मग्न तळ्याकाठी, आणि युगान्त या नाटकांची एकत्रित साडे आठ तासांची त्रिनाट्य धारा ही अभिनव निर्मिती करुन त्याचे ५० प्रयोग केले.

काकांनी बादल सरकार यांच्या अबूहसन या नाटकाचा अनुवाद करुन त्याची निर्मिती केली.

आविष्कारमधून काकांनी प्रकाशीत केलेले साहित्यः

- रंगभूमीच्या दृष्टीने महत्वाची दोन पुस्तके:-
  - रंगनायक
  - तें आणि आम्ही
- दोन विशेषांक
  - आविष्कार - तिशी
  - आविष्कार - चाळीशी
- सहा नाटके
  - सावल्या - लेखक चेतन दातार
  - राधा वजा रानडे - लेखक चेतन दातार
  - ढोलताशे - लेखक चं. प्र. देशपांडे
  - बुद्धिबळ आणि झब्बू - लेखक चं. प्र. देशपांडे
  - जगदंबा - लेखक रामदास भटकळ
  - बयादार उगड - लेखिका सुषमा देशपांडे

काकांच्या नेतृत्वाखाली आविष्कारने २६ महोत्सवांचे आयोजन केले ज्यात नाट्य प्रेमींना

२०५ नाविन्यपूर्ण नाट्यकृतींची मेजवानी मिळाली. यात १५ तरुण दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या विजय तेंडुलकरांच्या नाटकांचे दोन महोत्सव व महेश एलकुंचवारांच्या नाटकांचा महोत्सव यांचा समावेश होतो. नाविन्यपूर्ण कलाकृती आणि कलात्मकता यांना सतत उत्तेजन देण्याचा आपला ध्यास पूर्ण करताना काकांनी कुठलेही शिखर गाठायचे शिल्लक ठेवलेले नाही.

काकांना मिळालेले काही महत्व पूर्ण मानसन्मान:

- ९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष, २०१४
- नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, २०१३ (महाराष्ट्र शासन)
- संगीत नाटक अकाडेमी पुरस्कार, २०१२ (नाट्य कलेच्या क्षेत्रातील सर्वांगीण योगदानासाठी)
- जीवन गौरव पुरस्कार, २०११ (झी टी. व्ही. मराठी)
- सह्याद्री नाट्य रत्न पुरस्कार, २००७ (सह्याद्री टी. व्ही.)
- महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, २००५ (महाराष्ट्र शासन)
- उत्तुंग गुणी जन पुरस्कार, १९९९ (उत्तुंग प्रतिष्ठान)
- गणेश सोळंकी स्मृती पुरस्कार, १९८४ (नाट्य दर्पण प्रतिष्ठान)

# १४ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन-अध्यक्षीय भाषण

नमस्कार !

६ ऑक्टोबर, २०१३ रोजी अखिल भारतीय मराठी नाटयपरिषदेने १४ व्या नाटयसंमेलनाध्यक्षपदी माझी एकमताने निवड केली त्याबद्दल परिषदेच्या विषय नियामक मंडळाचा मी आभारी आहे. तसेच डॉ. ताराबाई भवाळकर, कीर्ति शिलेदार, मदन गडकरी यांचे तसेच सांगली, पुणे व नागपुर येथील नाटयपरिषदेच्या पदाधिका-यांचेही आभार मानतो.

ही निवड झाल्यानंतर महाराष्ट्रातून व जगभरातून आलेल्या रसिकांच्या भरभरुन प्रतिक्रियांमुळे मी भारावून गेलो आहे. म्हणूनच आज या व्यासपीठावरुन सर्व रंगकर्मीचा व नाटयरसिकांचाही प्रतिनिधी म्हणून तुमच्या समोर उभा आहे . माझ्याकडून रसिकांनी खूप अपेक्षा बाळगल्या आहेत. तसे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. तसे पाहिले तर नाटयसंमेलनाध्यक्षाला काहीच अधिकार नसतात, तरीही रसिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न मी या एक वर्षाच्या कालावधीत करणार आहे व तशा प्रकारचे काही प्रस्ताव मी नाटयपरिषेदेला व महाराष्ट्र शासनाला देणार आहे व त्याचा पाठपुरावाही करणार आहे व त्या सर्वांचा अहवाल ९५ व्या नाटयसंमेलनाच्यावेळी आपल्यासमोर ठेवणार आहे.

कुतुहलाने मी आतापर्यंतच्या नाटयसंमेलनाध्यक्षांच्या नांवाची यादी पाहिली थोर लेखक, नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, गायक कलाकरा, समिक्षक अशा दिग्गजांची नावे आहेत. पण रंगभूमीच्या सर्वांगिण विकासासाठी सहा दशकं काम करणा-या माझ्यासारख्या नाटयधर्मी रंगकर्मीची निवड प्रथमच होत आहे.

मला वाटतं सकारात्मक परिवर्तनाची ही नांदी असू शकते .

प्रथम मी नाटयसंमेलनं कोणत्या उद्देशाने भरवली जातात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. १९०५ पहिल्याच नाटय संमेलनात हे उद्दठरविण्यात आले आहेत.

1. नाटयकलेचे पाऊल कशा रितीने पडते. उत्तम नाटककार नट कशारितीने उदयास येतील. त्या संबंधाने विद्वानांनी व सर्व नाटक मंडळयांनी एकत्र बसून चर्चा करणे.
2. नविन नाटककारांना उत्तेजन मिळावे, आपद्ग्रस्तांना सहाय मिळावे व यासाठी नाटक मंडळीनी मदत करुन फंड जमविणे.

   त्याचप्रमाणे नाटयपरिषदेचे उद्देश जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

- मराठी नाटयवाङ:मय, नाटयकला, नाटयशास्त्र, रंगभूमी व तदानुविषयक सांस्कृतिक कार्य हयांच्या सर्वांगिण अभिवृध्दीसाठी प्रयत्न करणे, उपाय योजणे, त्यासाठी झटणे व त्यासाठी अभ्यासास व संशोधनास प्रोत्साहान देणे.
- परिषदेच्या कार्यासाठी नाटयचळवळीशी व नाटयव्यवसायाशी संबंधित अशा व्यक्तींची व संस्थांची संघटना बांधणे.

रंगभूमीच्या उत्कर्षासाठी सर्वांगिण विकासासाठी नाटयपरिषदेचे व्यापक उद्देश्य आहेत व ते साध्य करण्यासाठी सध्याची कार्यकारिणी कटीबध्द आहे असे मला वाटते. म्हणूनच नाटयपरिषद व मी -आम्ही मिळून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणार आहोत.

प्रथमच महत्वाचा प्रश्न समोर मांडतो. सहा वर्षापूर्वी १४ जून २००७ रोजी भरपावसात नाटयपरिषदेच्या विरुध्द यशवंत नाटयसंकुलात प्रयोगिक व बालरंगभूमीला जागा मिळावी यासाठी आम्ही लढा दिला होता. आमचे नेते विजय तेंडुलकर व दामू केंकरे हे आज हयात नाहीत पण आमचा लढा थांबलेला नाही. या लढयातील मी एक महत्वाचा साथीदार, असं असूनही परिषदेच्या मध्यवर्ती शाखेने अध्यक्षपदासाठी माझे नाव सुचविले. माझी संमती घेण्यासाठी आलेल्या नाटयपरिषदेच्या प्रतिनिधीने या लढयाची आठवण करुन दिली तरीही परिषदेने आपला हात पुढे केला तो मी स्वीकारला, एवढयाचसाठी की आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार परिषद व आम्ही करु व ही समस्या एकत्र बसून सामंजस्याने सोडवू.

पुढच्या वर्षीच्या नाटयसंमेलनापर्यंत आमच्या मागण्या मार्गी लागाव्यात अशी आशा आहे. दुर्दैवाने तसे नाहीच झाले तर मी त्याची कारणं आपल्यापुढे ठेवीन. मी आशावादी आहे. शेवटपर्यंत प्रयत्न करीत राहीन.

रसिक हो, मराठी रंगभूमीवर निरनिराळया स्तरांतून सृजनकार्य घडते आहे. त्याची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेणे महत्वाचं आहे. महाराष्ट्रात जेवढे सृजनकार्य होत आहे तेवढे इतरत्र दिसत नाही. बालरंगभूमी, हौशी, प्रायोगिक, व्यावसायिक सर्व स्तरांवर नाटयनिर्मिती व प्रयोग होतात. मी या सर्व स्तरांवर कार्य करणा-यांना भेटून आजची स्थिती, त्यांचे विचार, त्यांच्या अडचणी, मागण्या, तक्रारी जाणून घेण्याचा प्रयत्न केला व तो इथे मांडणार आहे. दोन दिवसांच्या या संमेलनात यांचा ऊहापोह व्हावा मला वाटते संमेलनाचे हेच उद्दिष्ट असते.

**बालरंगभूमी :-**

रसिकहो, मी पायापासूनच सुरुवात करतोय, शालेय व बालरंगभूमी हा पाया आहे . पाया मजबूत तर इमारत पक्की पण या पायाकडेच आम्ही दुर्लक्ष करतोय. बालरंगभूमीला दुय्यम समजतो आणि म्हणूनच हा महत्वाचा प्रस्ताव मांडतो.

शासनाने शालेय रंगभूमीचा विचार करुन नाटयकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा. यासाठी तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम ठरवावा लागेल. महापालिकेच्या व खाजगी शाळांतून हा विषय शिकविला गेला पाहिजे अशी योजना तयार करावी. त्यासाठी पहिले पाऊल म्हणजे शिक्षकांना नाटयकलेचे शिक्षण द्यावे लागेल किंवा आज निरनिराळया विद्यापिठातील नाटयविभागातून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेल्या कलाकारांच्या अशा शाळांतून नियुक्त्या करण्याचा विचार करावा लागेल. संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना नाटयकलेचे शिक्षण मिळाले तर त्यांच्याकडून भावी काळात रंगभूमी उजळून निघेल.

शालेय स्तरांवर नाटयस्पर्धा आयोजित होत असतातच. चार दशकांपूर्वी कुमार कला केंद्राच्या शालेय नाटयस्पर्धा आयोजित होत असत. गेली छत्तीस वर्षे वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान शालेय नाटयस्पर्धा आयोजित करीत आहे. महाराष्ट्र शासनाची बालनाटय स्पर्धा चालू आहेच. त्यातही बहुतांश शाळांचा सहभाग असतो. शासकीय पातळीवर बालनाटयस्पर्धा सुरु आहेत. त्यात आज बरीच सुधारणा झाली आहे. स्थानिक शिक्षणधिका-यांना विनंती करुन त्या विभागातील शालेय विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश दिला जातो त्यामुळे बाल प्रेक्षकांची गर्दी होते हे चित्र उत्साहदायी आहे. हयाच्याबरोबरीने शासनाने जिल्हा पातळीवर बालनाटय महोत्सवाचे आयोजन करावे त्यामुळे तेथील बालप्रेक्षकांना चांगली बालनाटय पहायची सवय लागेल.

नाटयकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश झाल्यावर या बालनाटय स्पर्धा व शालेय नाटयस्पर्धा दर्जेदार स्वरुपात पहायला मिळतील असे मला वाटते. प्रशिक्षण देवून शालेय स्तरावर बालनाटयांची निर्मिती होते ती दर्जेदार होते. दोन उदाहरणे देतो.

- कोकणात शिरगाव सारख्या एका खेडयात एक झपाटलेला डॉक्टर - डॉ. राजेंद्र चव्हाण, तेथील शाळेतील विदयार्थ्यांना प्रशिक्षण देऊन बालनाटयस्पर्धेत एकांकिका सादर करतो. या एकांकिकेचा दर्जा व बालकलाकारांचा अभिनय पाहिला की प्रशिक्षणाच्या महत्वाची प्रचिती येते.

- दुसरे उदाहरण महाराष्ट्रात मूक, बधीर, अंध अपंग अशा मुलांसाठी शाळांतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना कांचन सोनटक्के यांच्या रंगशाला या संस्थेतर्फे आधी प्रशिक्षण दिले जाते व राज्यस्तरावर या विद्यार्थ्यांसाठी एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या जातात. अशा स्पर्धातून या मूक, बधीर, अपंग कलाकारांचा अभिनय पाहून आपण थक्क होतो.

म्हणूनच शालेय स्तरावर अभ्यास क्रमात नाटयकला/नाटक/प्रयोगकला यांचा समावेश होणे फार महत्वाचे आणि गरजेचे आहे.

आज बालरंगभूमीवर कार्य करणा-या संस्था फार कमी आहेत. कारण एकतर त्यांची बालनाटये दिवाळीच्या किंवा उन्हाळयाच्या सुट्टीतच सादर करावी लागतात. बाल प्रेक्षक याच वेळी प्रयोग पाहू शकतात.

बालनाटयाच्या कल्पनाही वेगळया वेगळया आहेत- बालकलाकारांनी बाल व प्रौढ प्रेक्षकांसाठी, प्रौढ कलाकारांनी बाल प्रेक्षकांसाठी सादर करण्याचे नाटयप्रयोग डॉ.मोहन आगाशी ग्रिप्स थिएटर सारखी कल्पना मांडली आहेच.

गेली २५ वर्षे बाल रंगभूमीवर कार्य करणा-या संस्थाचालकांशी मी बोललो. आज बालनाटयाचे प्रयोग आर्थिकदृष्टया न परवडणारे झाले आहे. त्यांचे विचार समजून घेतले पाहिजेत. नाटयगृहाचे भाडे भरमसाठ वाढले आहे. काही ठिकाणी नाटयगृहाच्या भाडयात सवलत मिळते पण तिकिट दर रु.६०/- लावला पाहिजे अशी सक्ती केली जाते. परंतु प्रयोगासाठी लागणारा, जाहिरात, वाहतुक नेपथ्य, प्रकाश, चहाफराळ यांचा खर्च मात्र तेवढाच असतो. म्हणजे नाटयगृहाच्या सवलतीच्या भाडयात प्रयोग केला तर तीन ते चार हजार रुपये वाचतात पण साठ रुपये तिकिट लावले तर पैसे वाचण्यापेक्षा दुप्पट तोटा होतो. तेव्हा नाटयगृहाच्या भाडयात सवलत देऊन साठ रुपये तिकिट लावा म्हणणे योग्य नाही. अहो, नाटयगृहाच्या भाडयात सवलत मिळाली पाहिजे पण नेहमीच्या तिकिटाच्या दरात प्रयोग व्हायला हवेत . म्हणजेच किमान प्रयोगाचा खर्च तरी त्यातून निघू शकेल.

बालनाटयसंस्था बालनाटयाचे प्रयोग करुन श्रीमंत झालेल्या पाहिल्यात का ? स्वप्नात तरी ? आमच्या दुर्गा झाली गौरी या नृत्यनाटयाचे प्रयोग आर्थिक तोटा सहन करत २९ वर्षे चालू ठेवले. कर्जबाजारी झालो तेव्हा नाइलाजाने प्रयोग बंद करावे लागले, एक अभिजात नृत्यनाटय बंद करावे लागणे क्लेशदायक होते. पण त्या शिवाय गत्यंतर नव्हते.

तरीही काही बालनाटय संस्था दिवाळीच्या आणि उन्हाळयाच्या सुट्टीत प्रयोग करीतच असतात. शासन नाटय संस्थेच्या व्यावसायिक नाटयप्रयोगांना अनुदान देते पण बालनाटयस्पर्धा आयोजित करण्यापलिकडे बालरंगभूमीकडे पहातही नाही. रजिस्टर्ड नाटयसंस्थांना जसे अनुदान मंजूर होते तसेच रजिस्टर्ड बाल नाटयसंस्थांना तसेच बालनाटयप्रयोगांनाही अनुदान द्यावे. तसा अध्यादेश निघाला तर बालरंगभूमीचे आजचे स्वरुप नक्की बदलू शकेल. तसे कालानुरुप ते बदलते आहेच. मुलांसाठीचे कार्टून्स व इतर चॅनल्स मुलांना बारा महिने घरबसल्या पहायला मिळतात. बालप्रेक्षकांना आता अशीच नाटकं रंगभूमीवर पहायला आवडतात. तसे प्रयोग बालनाटयसंस्थाही करु पाहतात पण यापुढेही जाऊन बाल प्रेक्षकांच्या कल्पना शक्तीशी खेळायला लावणारे वास्तव, काल्पनिक अशा बालनाटयांचे प्रयोग करुन बघायला हवेत.

आणखी एक सूचना : शाळेच्या वार्षिक परिक्षेच्या गुणात जसे खेळाच्या प्राविण्याबद्दल अधिक गुण मिळविले

जातात त्याचप्रमाणे रंगभूमीवर प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणात अधिक गुण मिळवावेत.

**तरुणाई रंगभूमी :-**

तरुणाई रंगभूमीला आपण महाविद्यालयीन स्पर्धामधूनच अनुभवतो. रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने या महाविद्यालयीन नाटयस्पर्धा मोलाच्या आहेत. पुण्यातील पुरुषोत्तम करंडक स्पर्धा सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करते. एवढया सातत्याने व निष्ठेने स्पर्धा चालविणे सोपे नाही. मुंबईतील आय. एन्.टी. सवाई व इतरत्र महाराष्ट्रात अशा अनेक स्पर्धांचे निरनिराळया संस्थातर्फे वर्षभर आयोजन होते. नुकतीच राज्य पातळीवर नाटयसंपदेने महाविद्यालय पातळीवर स्पर्धा आयोतिज केली होती. यातूनच मराठी रंगभूमीला तरुण ऊर्जा मिळत रहाते. कल्पना एक आविष्कार अनेक सारख्या स्पर्धातून लेखक -दिग्दर्शकांची कसोटी लागते.अशा लेखकांना उत्तेजन देणे गरजेचे आहे. व्यावसायिक व प्रायोगिक रंगभूमींना अशा उमलत्या लेखकांच्या शोधात असायला हवे. त्यासाठी नाटयनिर्मातासंघाने दीर्घाक स्पर्धा आयोतिज केली आहे.यातून काही नवीन नाटककार हाती लागतात का हे कळून येईल. नाटयपरिषदेच्याही सर्व शाखांवर एकांकीका स्पर्धेचे आयोजन होत आहे. त्याचबरोबर नाटयलेखन स्पर्धाही आयोजित होते. सर्वोत्कृष्ट नाटयलेखकाला बक्षीसही दिले जाते. माझी अशी सूचना आहे की, या स्पर्धेतील तीन उत्कृष्ट नाटकांची निर्मिती परिषदेच्या शाखांनी करावी व नवोदितांना कार्यप्रवण करावे.

थोडक्यात नाटककारांच्या शोधात अनेक संस्थांच्या विविध नाटयस्पर्धा !

**हौशी रंगभूमी :-**

हौशी रंगभूमीवर काही कारणपरत्वे नाटयप्रयोग सादर केले जातात. वार्षिक महोत्सवच असतो. महाराष्ट्र राज्य हौशी राज्य नाटयस्पर्धेच्या निमित्ताने दरवर्षी नाटयनिर्मिती होते ती बहुतांश बँक, महापालिका किंवा इतर निरनिराळया कार्यालयातील कलाविभागांकडून. हल्ली हौशेने नाटयसंस्थांची संख्या वाढली आहे असे शासनाकडून समजते. हौसेखातर नाटयमिर्मिती करणा-यांना संस्था हौशी नाटयसंस्था म्हणावे. शासनाची ही हौशी नाटयस्पर्धा आता साठ वर्षाची होईल . एवढी प्रदीर्घ काळ चालणारी नाटयस्पर्धा भारतातील एकमेव स्पर्धा आहे. सुरुवातीच्या काळातील स्पर्धेतून रंगभूमीला अनेक नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, तंत्रज्ञ लाभले. त्यावेळच्या स्पर्धेतील प्रयोगांना प्रेक्षकांची तुडंब गर्दी होत असे. आता काय चित्र दिसते ? स्पर्धेसाठी शेकडोंनी प्रवेश अर्ज येतात. कुठलेही नाटक स्पर्धेमध्ये सादर होते. त्याचा दर्जा पाहिला जातो का ? स्पर्धेच्या प्रयोगाला प्रेक्षक असतो का ? तेव्हा शासनाने पहिल्याप्रमाणे नवीन नाटकाची अट घालावी म्हणजे नवीन संहिता लिहिल्या जातील.

बोलंक उदाहरण - औरंगाबाद केद्रांचे, किमान सात प्रवेशिका आल्या तरच त्या केंद्राला मान्यता मिळते कमी आल्या तर अशा संस्थांचे प्रयोग शेजारच्या केंद्रावर करावे लागतात. पण औरंगाबादच्या विद्यापीठातील नाटयशाखेच्या प्रमुखाने पुढाकार घेऊन सात नवीन नाटकांचे प्रयोग सादर केले. औरंगाबाद केंद्रावर या नाटकांचा महोत्सव होतोय. निरनिराळया केंद्रात स्पर्धेची व्यवस्था समाजकल्याण खात्यातर्फे केली जात होती. आता या केंद्रांची व्यवस्था स्थानिक नाटयसंस्थेवर किंवा नाटयपरिषदेच्या स्थानिक शाखेवर सोपवली जाते किवा विद्यापीठाच्या नाटयशाखेतून उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना निरनिराळया केंद्रात व्यवस्थापनाची जबाबदारी दिली जाते. प्रयोग संपल्याक्षणी संस्थांना धनादेश दिला जातो. तिकिटविक्रीतील अर्धी रक्कम दिली जाते. शासनाच्या या सुधारणांचे स्वागत !

नाटय परिषदेशी संलग्न हौशी रंगमंचसंघटना वर्षभरात मराठी रंगभूमीसाठी काय कार्य करते हे कोणालाच माहित नाही. म्हणून या संघटनेचा मी विचार करीत नाही. ती फक्त कागदोपत्री आहे इतकेच.

**प्रायोगिक रंगभूमी :-**

आपण पहाल प्रायोगिक नाटकाची व्याख्या कुणीच केलेली नाही. शासनाने व्यावसायिक नाटाकची व्याख्या केलेली आहे. पण प्रायोगिक नाट्यप्रयोगांना अनुदान देण्याच्या अध्यादेशात व्याख्या न देता नुसतेच प्रायोगिक नाटक असे म्हटले आहे. शासनाची व्यावसायीक नाटाकची व्याख्या पाहिली तर त्या व्याख्येप्रमाणे काही प्रायोगिक नाटयसंस्थानाही ही व्याख्याा लागू पडते.

नाटय परिनिरीक्षण मंडळ प्रायोगिक नाटाकांना प्रमाणपत्र देते, ते कोणत्या आधारावर? नाटककराने माझे नाटक प्रायोगिक असे अर्जात नमूद केले आहे म्हणून? कालचे यशस्वी प्रायोगिक नाटक आजचे व्यवसायिक नाटक होते. मग त्यासाठी प्रमाणपत्र मिळविले जाते. पूर्वी व्यावसायिक किंवा प्रायोगिक अशी वेगवेगळी प्रमाणपत्र मिळत नसत. केवळ महसूल वाढावा म्हणून हे भेद केले गेले आहेत का ?

नाटयपरिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्षापासून सभासद व कार्यालयातील कर्मचारी बदलले आहेत. प्रमाणपत्रे वेळेवर मिळत नाहीत. एखाद्या चांगल्या नाटकाचा प्रयोग नाटयमहोत्सवात असेल तर पूर्वी तात्पुरते प्रमाण पत्र मिळत असे आता तेही मिळत नाही. कारण संहिता वाचून शिफारस करणारे बहुतेक सभासद मुंबई बाहेरचे आहेत. म्हणून निर्मात्यांना वेळच्यावेळी प्रमाणपत्रे मिळत नाहीत अशा तक्रारी ऐकू येतात.

आपण पाहिलेत बालनाटयस्पर्धा होतात. हौशी नाटयस्पर्धा होतात, व्यावसायिक नाटकांच्या स्पर्धा होतात. पण प्रायोगिक नाटकांच्या स्पर्धा होत नाहीत. प्रायोगिक नाटकांची त्रिशंकूसारखी अवस्था होते. पण आजपर्यंत व्यावसायिक नाटकाला प्रगतीपथावर नेण्यात प्रायोगिक नाटाकचा फार मोठा वाटा आहे. प्रायोगिक नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीला नव्या दमाचे नाटककार, दिग्दर्शक, नेपथ्यकार व अभिनेते मिळवून दिलेले आहेत. या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करता येत नाही. काहींचे म्हणणे असे की प्रायोगिक रंगभूमी व्यावसायिक रंगभूमीला पूरक आहे. काही म्हणतात समांतर आहे. मी म्हणतो दोन्ही असूनही ती स्पर्धक आहे.

"सध्या महाराष्ट्रात प्रायोगिक नामक चाललेलं नाही आहे ते सगळ नॉन प्रोफेशनल अमॅटर थिएटर आहे". ज्यानी कुणी हे विधान केले आहे ते प्रायोगिक नाटयप्रयोग न पहाता केले आहे.

७४ साली छबिलदास सुरु झाल्यावर कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे उदयास आलेल्या नाटयसंस्था आज कुठे आहेत? महाराष्ट्रात प्रायोगिक नाटयसंस्था किती आहेत ? एके काळी जिल्हापातळीवर कार्य करणा-या प्रायोगिक नाटयसंस्था आज अभावानेच कार्यरत असलेल्या दिसतात.

प्रायोगिक नाटाकची व्याख्या करता येत नाही कारण ती व्यक्तीसापेक्ष आहे असे मला वाटते. पण लक्षणं आपण सांगू शकतो. तिच्या कार्याप्रणाली बद्दल आपण बोलू शकतो.

माझी कल्पना मांडतो.

आज आपण जगात पाहतो कोणत्याही क्षेत्राचा विकास, प्रगती व्हायची असेल तर अशा क्षेत्रासाठी औद्योगिक, किंवा कोणत्याही व्यवसायात एक स्वतंत्र विभाग असतो. याचं नाव आर.ॲन्ड डी. -रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट व त्यासाठी आवश्यक त्या पैशाची तरतूद केला जातो. म्हणूनच रंगभूमी या कलामाध्यमाचा विकास करावयचा असेल आर्. ॲन्ड. डी. ची कास धरली पाहिजे. प्रायोगिक रंगभूमीचे हेच कार्य आहे. त्यासाठी माझी चतु:सूत्री आहे - संशोधन, प्रयोगशीलता, प्रशिक्षण व नाटयानुभव ही प्रायोगिक रंगभूमीच्या कार्याची व्याप्ती.

- संशोधनातून प्रगती
- प्रयोगशीलतेतून चहुअंगांनी सर्व घटकाचा विकास
- प्रशिक्षणाने आत्मभान

● नाटयानुभवातून प्रगल्भता

उदाहरणच द्यायचे झाले तर आमच्या तरुण लेखिकेचे इरावत कर्णिकचे, तिने गुरुकडून प्रशिक्षण घेतले, नाटयलेखनाचा दिग्दर्शनाचा अनुभव घेतला आणि चेतन दातारबरोबर रंगनृत्यशैली सादरीकरणासाठी संशोधन केले. आज तिचं व्यावसायिक रंगभूमीवर आलेलं नवीन नाटक याची साक्ष देईल.

प्रायोगिक नाटकांचे प्रयोग करण्यासाठी आम्हाला सर्व सोयींनी युक्त २५० आसनापर्यंतची छोटी नाटयगृहे हवी आहेत. आमचा लढा त्याचसाठी आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणात जिल्हापातळीवर अशी छोटी नाटयगृहे बांधण्याचा प्रस्तवा आहे. अजुन तो कागदावरच आहे. तो लगेच कार्यान्वित करावा आणि पहिले नाटयगृह महाराष्ट्राच्या राजधानीत - मुंबईत – मध्यवर्ती ठिकाणी उभारावे. शासनाने नाहीतर महापालिकेने हे काम हाती घ्यावे दीनानाथ नाटयगृहाच्या दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च करुनही ते अजूनही बंदच आहे. दादर - माहिमा या मध्यवर्ती विभागात म्युनिसिपालिटीच्या अनेक शाळा आहेत. अशा शाळात असे छोटे नाटयगृह बांधता येऊ शकते. नाहीतरी सध्या आम्ही माहिमच्या म्युनिसिपालिटीच्या शाळेतच आमचे सृजनकार्य, प्रशिक्षणकार्य करतो आहोत. काहीजण याला खुराडा म्हणतात तरीही प्रेक्षक नाटक पाहायला येतात, तेही सर्व अडचणी लक्षात घेऊ.

आता शासनाने नव्याने बांधलेले रविन्द्र नाटयमंदिर म्हणजेच पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी इथे तिस-या मजल्यावर छोटे थिएटर आहे पण ख-या अर्थाने ते नाटकासाठीचे नाही. हे थिएटर चित्रपटासाठी आहे. तरीही आम्ही इथे नाटयप्रयोग करतो. त्यासाठी रस्त्यावरुन तिस-या मजल्यावर सेट व इतर सामान पाय-या चढून घेऊन जातो. कारण ते मध्यवर्ती ठिकाण आहे. सगळया गैरसोयी सोसून तिथे पयोग करतो.

दुसरं महत्वाचं, ही कला अकादमी आहे. कारण अकादमी म्हणजे कलेचं शिक्षण देणारी संस्था किंवा कलेला उत्तेजन देणारी संस्था पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी सुरु झाल्यापासून तिथे कोणत्या कलांचे शिक्षण दिले गेले किंवा दिले जात आहे ?

जुन्या रविंद्र नाटयमंदिरात निवासासाठी १० खोल्या होत्या त्यामुळे आम्हाला बाहेरच्या राज्यातून चांगली नाटकं मुंबईकर प्रेक्षकांना दाखवता यायची आज तिथें काही सूटस आहेत ते कुणासाठी ?

पु. ल. देशपांडे कला अकादमी कलेचे माहेरघर नाही असे दुर्दैवाने म्हणावं लागते. कला अकादमी बद्दल पु. ल. नी काय स्वप्न पाहिलं असेल आणि आज काय परिस्थिती आहे ? रसिकांनी विचार करावा.

मला सांगण्यात आले की, प्रायोगिक नाटकासाठी पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या चौथ्या मजल्यावर ब्लॅक बॉक्स बांधायचा प्रस्ताव आहे. पण चौथ्या मजल्यावर सेटचे सामान नेणार कसे ? अन प्रयोग करणार कसा ? पणजीला दामू केंकरे यांनी गोवा कला अकादमीत तळमजल्यावर ब्लॅक बॉक्स बांधून घेतला आहे. आज एवढे मराठी उद्योगपती आहेत. काही बांधकाम क्षेत्रातही आहेत यांची कलेकडे बघण्याची दृष्टी काय आहे ? टाटांनी एन. सी. पी. ए. संकुल बांधले. बिर्लानी बिर्ला मातोश्री सभागृह व बिर्ला क्रिडा मंदिर बांधले. शशी कपूरनी पृथ्वी थिएटर उभं केलं. तर डॉ. अ. ना. भालेराव यांना साहित्यसंघ.

मुंबईतील विलेपार्ले येथील साठ्ये कॉलेजसारखी एक शैक्षणिक संस्था आम्हाला असे छोटे नाटयगृह उपलब्ध करून देते. तर परिषदेला, महापालिकेला, शासनाला ते का जमू नये? किंवा एखाद्या मराठी उद्योजकालाही ?

**कामगार रंगभूमी :-**

गिरणगाव जसं उध्वस्त होऊ लागले. तसे गिरणी मालकांनी गिरण्या बंद करून मॉल उभे केले त्यामळे गिरणी

कामगार गिरणगावातून हद्दपार झाले. सशक्त कामगार रंगभूमीची ऊर्जा संपत आली. तळागळातल्या लोकांच्या समस्याना तोंड फोडणारे लेखक कमी झाले. नाटयसंस्था राहिल्या नाहीत अशी आज अवस्था आहे. मुबंईतील कामगार नाटयस्पर्धा बंदच झाल्यात. पुण्यात धुकधुकीने चालू आहेत.

**लोक रंगभूमी :-**

दादा कोंडके, काळू-बाळू, विठ्ठल उमप या महान कलाकारानंतर लोकनाटय पाहायला मिळेनासे झाले महाराष्ट्रात काही विभागात ते अजुन टिकून आहे मराठवाडयात भारुडी परंपरा अजून जिवंत आहे. कोकणात दशावतार, विदर्भातही खडी गम्मत.

काही वर्षापूर्वी संगीत नाटक अकाडेमी, नवी दिल्ली या संस्थेने एक योजना यशस्वीरित्या राबवली होती - Use of folk form in modern plays.

शासनाने अशा पध्दतीने स्पर्धा किंवा महोत्सव सुरु केल्यास लोककलेला नव्यास्वरुपात पाहता येऊ शकेल. महाराष्ट्रात तमाशा अजून खेडोपाडी चालू आहे. पण त्याचे स्वरुप बदलले आहे. मुंबईत हनुमान थिएटर बंद झाल्यापासून संगीत बा-याही कमी झाल्या. पण आता काही स्त्री कलाकारांनी ही कला नवीन स्वरूपात कमानी रंगमंचावर आणली आहे. प्रतिसादही चांगला आहे. लावणी महोत्सवही काही ठिकाणी आयोजित होतात.

याच पंढरपूरात काह वर्षापूर्वी होळीच्या दिवशी उत्पातांच्या शृगांरीक लावण्या पहाटपर्यंत आम्ही ऐकत होतो. त्यानी संशोधन करुन या जुन्या लावण्या शोधून काढल्या. त्या लिहिल्या कोणी माहीत नाही. या लावण्या ध्वनिमुद्रीत केल्या की नाही याची कल्पना नाही. मात्र हा लोकसंगीताचा ठेवा जपायला हवा.

**संगीत रंगभूमी :-**

पारंपारिक संगीत नाटकांचा मधून मधून पुनर्निर्मिती होते आहे. त्यांचे प्रयोगही प्रेक्षकांना आवडत आहेत. पण या पलीकडे नवीन संगीत नाटक रंगभूमीवर येत नाही. विद्याधर गोखले यांनी संगित नाटकाच्या संहिता लिहून काही काळापुरती आशादायक परिस्थिती निर्माण केली होती. आज अशा संहिता लिहिल्या जात नाहीत. निर्मात्यांनाही संगीत नाटाकची निर्मिती करण्याचे धाडस होत नाही. मी " संगीत बयादार उघड" या नाटकाची निर्मिती केली, शंभराहून जास्त प्रयोग केले पण जमाखर्चाची तोंडमिळवीणी होत नाही. संगीत नाटकांची निर्मिती करायचा धीर हवा त्यासाठी पाठपुरावा करायला हवा. असे संगीतकार पुढे यायला हवेत.

अशा सगळया समस्यातून संगतीनाटक एका नव्या स्वरुपात कोणीतरी धाडसी निर्मात्याने रंगभूमीवर आणावे अशी वाट पहाण्यावाचून आपण सध्यातरी दुसरे काही करु शकत नाही अशी संगीतनाटकाची आजची परिस्थिती आहे. मी रामदास कामत यांच्याशी बोललो त्यांचे प्रयत्न चालू आहेत महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. संजय देवतळे यांनी संगीत नाटकांच्या प्रयांगांना रु. ३०,०००/- चे अनुदान मिळेल असे जाहिर केले. यावर्षी संगती नाटक रंगभूमीवर येईल अशी आशा करूया.

**बोधी नाटय परिषद :-**

बोधी कला संगिती ...

बोधी नाटय परिषदेचे संस्थापक प्रेमानंद गज्वी यांची मते जाणून घेतली. ते म्हणतात ही Theatre of knowledge- ज्ञानाची रंगभूमी आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे नाटयलेखन कार्यशाळा आयोजित होतात. मला अस वाटतं बोधी कला संगीताने मूळ धारेत यावे. म्हणजे सगळयाच प्रेक्षकांना एक नवीन विचार करणारे नाटक पहाण्याचा योग येईल. मी बोधी नाटयलेखन कार्यशाळेत सामील झालेल्या सिध्दार्थ तांबे यांचे 'जाता नाही जात' हे नाटक मूळ धारेतच सादर केलं. प्रेक्षकांचाही त्याला चांगला प्रतिसाद लाभला. डॉ.

लागूनीही गज्वीचे नाटक 'किरवंत' केलच ना ? बोधी नाटय परिषद अ.भा. मराठी नाटय परिषदेला संलग्न करावी. किंवा तसे न करताही मुख्य धारेत तुमची नाटके सादर करा. प्रेक्षकांनाही Theatre & knowledge ची नाटके पाहण्याची सवय लागेल.

तसं विद्रोही रंगमंच- विद्रोही नाटकही मूळ धारेत येऊ द्या. तुमच्या व्यथा, आकांक्षा, राग प्रेक्षकांना कळू द्या. मला असे वाटते की मनातला हा विद्रोह नाटयरुपात बाहेर पडला तर मन शांत होऊ शकेल. विद्रोहाची धार बोथटही होऊ शकेल.

कोणतीही कला जात पात, धर्म टक्केवारी मानीत नाही. एकसंघ समाजाचे स्वप्न एकसंघ कलेच्या माध्यमातूनच साकारु शकते. आपली राजकीय विचारप्रणाली काहीही असली तर ती मतपेटीतून व्यक्त करावी. कोणताही धर्म असो तो उंबरठयाच्या आत ठेवावा. म्हणजे तुम्हाला मुक्तपणे सृजनकार्य करता येऊ शकते. Theatre Should not be dogmatic but pragmatic and progressive आपली बांधीलकी असलीच तर ती रंगभूमीच्या विकासाशी असावी कोणत्याही राजकीय तत्वप्रणालीशी नसावी.

**व्यावसायिक रंगभूमी :-**

आता व्यावसायिक रंगभूमी कुणाला म्हणावे याची सरकारी व्याख्या आहे तीच आपण गृहीत धरु.

व्यावसायिक नाटयसंस्था याचा अर्थ "नाटयनिर्मिती करणे, त्याचे व्यावसायिक प्रयोग करणे, व पूर्ण वेळ व्यवसाय आहे अशी संस्था"

माझ्या पिढीतील निर्मात्यांच्या अशा संस्था होत्या. प्रभाकर पणशीकरांची 'नाटयसंपदा' मोहन वाघांची 'चंद्रलेखा' आणि मोहन तोंडवळकरांची 'कलावैभव'.

आज असे निर्माते व अशा संस्था किती ? पूर्णवेळ व्यवसाय करणारे किती व पार्टटाईम व्यवसाय करणारे किती ? याचा शोध घ्यावा लागेल. मुख्य व्यवसायात कमावलेल्या नफ्यातून नाटयव्यवसायात गुंतवणूक होते आहे. कार्पोरेट सेक्टर असे स्वरुप नाटयव्यवसायाला येऊ पाहते आहे. आज व्यावसायिक नाटकाचे स्वरुप बदलते आहे, मन्वंतर घडते आहे. हसवणूक कमी होताना दिसतेय. एरव्ही विनोदी नाटकांनी धुमाकूळ घातला होता. आज आशयघन, वैचारिक, समस्याप्रधान नाटकांची निर्मिती होते आहे. नवीन आशयाची, नवीन मांडणीची व मुख्यत्वेकरुन सिलेब्रिटी अभिनेते / अभिनेत्री यांना घेऊन ही नाटके सादर होत आहेत. कालचे स्ट्रगलर आज सिलेब्रिटी झाले आहेत. प्रेक्षकही या नाटकांना गर्दी करताना दिसताहेत. सिलेब्रिटी कलाकारांचे कौतुक करायला हवे. त्यांच्या काळ काम वेगाचे वेळापत्रक योग्य त-हेने ते तयार करताना दिसतात निर्मातेही या वेळापत्रकानुसार प्रयोगाचे अयोजन करताना दिसतात. मी या बदलाचे स्वगात करतो. मी स्वागत करतो ते या व्यवसायात काही अभिनेत्रींनी प्रवेश केला आहे. त्यांच्याकडून नवीन जाणीवा, नवीन समस्या घेऊन दर्जेदार नाटयनिर्मिती होत आहे. या अभिनेत्रीचे मी मनापासून अभिनंदन करतो, आणी म्हणतो ! यशस्वी भव !

अजून एक बदल घडलेला आपल्याला दिसून येईल व्यवसायिक रंगभूमिवर सहकारपर्व सुरु झाले आहे. अनेक निर्माते एकत्र येऊन सहकारी तत्वावर नाटयनिर्मिती करताहेत. यात सहकारमहर्षि कोण असेल ते येणारा काळ ठरवेल.

आज मराठी रंगभूमीवर एकाचवेळी पन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग सुरु आहेत. ही माझ्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. एवढे सृजनकार्य आज महाराष्ट्रात चालले आहे.

आता एवढया नाटकांचे मुंबई-पुण्यातलेच प्रयोग घेतले तर वर्षाला किमान सहा हजार प्रयोग होताना दिसतील.

याची आर्थिक उलाढाल किती असेल याचा जाणकारांनी हिशाब करावा. किती कोटीच्या घरात जाते ते कळून येईल. म्हणजे महाराष्ट्रापुरता विचार करायचा तर ह्या जिवंतकलेचा कॉर्पोरेट सेक्टरमध्ये समील होऊ शकतो. बघा गणित करुन.

थोडक्यात आपण एवढे पाहिले. आता दुसरे चित्रस काय दिसतं ? मी नाटयनिर्मीता संघाचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांना भेटलो व त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला. प्रशांतनी अडचणींचा पाढाच वाचला. पण या अडचणींना तोंड देत रंगभूमीचा प्रवास चालू आहे.

अनुदानासाठी सहा महसूल विभागात प्रयोग करावे लागतात. तिथल्या नाटयगृहांच्या अवस्थेबद्दल खूप नाराजी आहे. ही नाटयगृहे महापालिकेची, शासनाची व इतर संस्थांची आहेत. महाराष्ट्रात साठ नाटयगृहे जेमतेम ब-या अवस्थेत आहेत असा प्रशांतचा अनुभव. त्याने काही नाटयगृहांची भाडी सांगितली, मी चकित झालो धुळे, नंदुरबार येथे ४२,०००/- व रु. २७,०००/- एवढे भाडे आकारले जाते. प्रशांती सूचना -नगर विकास खात्याकडे ही नाटयगृहे सूपूर्त करावीत. पाच कोटी अनुदानातून या नाटयगृहींची डागडुजी, स्वच्छता करावी. भाडयाची रक्कम समान करावी. सूचना चांगली आहे पण ती कितपत कार्यान्वित होईल याची मला शंका आहे.

दुसरी सूचना - दौ-यावर असताना हॉटेलचा खर्च फार असतो. नाटकाच्या प्रयोगाचे दिवशी विश्रामगृहे मोकळी असतील तर ती उपलब्ध करुन द्यावी.

आणखी एक सूचना - की सर्व परवाने मिळाविण्यासाठी एक खिडकी योजना शासनाने तयार करावी. म्हणजे हे सर्व परवाने मिळविताना निरनिराळ्या सरकारी खात्यात चकरा माराव्या लागणार नाहीत. नाटयपरिषदेने व नाटयनिर्मातांसंघाने याचा पाठपुरावा करावा.

प्रशांतचा एक अनुभव अतिश खेदजनक आहे. एका ठिकाणी जिल्हाधिकारी यांनी नाटकाच्या तिकीटावर करमणूक कराची मागणी केली. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांनी करमणूक कर रद्द केला होता. आज पाच दशकांनंतर ह्या कराची पुन्हा मागणी होते. करमणूक कर रद्द झाल्याचा पुरावा म्हणून अध्यादेशाची प्रत माण्यात येते व ती सादर करु असे प्रतिज्ञापत्र (Bond) प्रशांतला द्यावा लागते, दुर्दैव ! अशाप्रकारे करमणुक कर मगाण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे का ? संमेलनात याचा विचार व्हावा.

यशवंतरावांनी करमणूक कर रद्द केला पण त्यांचाच नावाच्या नाटय गृहात प्रयोग करायचा झाला तर प्रत्येक प्रयोगाला रु.१,०००/- अधीक द्यावे लागतात. कारण नाटय गृहाला PWD चे Completion Certificate नाही. व्यावसायिक निर्माते यावर काही बोलतच नाहीत, प्रायोगिक नाटयसंस्थांना हा कर देणे अशक्य होते.

**रंगमंच कामगार संघटना :-**

नाटयप्रयोग ज्याच्या जिवावर उभा होतो तो रंगमंचकामगार Backstage worker. एक चांगली गोष्ट झाली आहे ती म्हणजे नाटयनिर्मातासंघ व रंगमंचकामगार संघटना दोन वर्षाचा करार झाला आहे. त्याप्रमाणे प्रत्येक Backstage worker ला प्रत्येक प्रयोगाचा ठराविक मोबदला द्यावा लागतो. मग ते नाटक कोणत्याही निर्मात्याचे असो. व्यावसायिक वा प्रायोगिक. पण होते काय महिन्यातून किमान १० प्रयोग तरी त्यांना मिळावेत म्हणजे दरमहा किमान रु.४,०००/- मिळू शकतील. पण वस्तुस्थिती उलट आहे. त्यांची उपजीविका या कामावरच अवलंबून आहे. महिन्याला किमान १० प्रयोग मिळाले नाही तर हे कामगार काम मिळेल तिकडे निघून जातात. म्हणूनच Backstage worker चा काहीवेळा तुटवडा भासतो. काही निर्मात्यांचे स्वतःचे रंगमंच कामगार आहेत. बाकीच्यांना ठेकेदारांकडून हे काम करुन द्यावे लागते. ठेकेदाराच्या पदरी अनेक

रंगमंच कामगार काम करतात. ठेकेदारानांही ठरलेली रक्कम देणे आवश्यक असते. आज मराठी रंगभूमीवर नऊ ठेकेदार आहेत ते वाहतुक देखिल करतात. काही निर्माते ठेकेदाराकडून नेपथ्य तयार करुन घेतात व प्रत्येक प्रयोगासाठी ठरलेली रक्कम देतात. म्हणजे सुरुवातीला नेपथ्यसाठी खर्च करावा लागत नाही.किंवा गोडाउनही ठेकेदाचेच असल्याने काही निर्मात्यांना ही सोय परवडते. थोडक्यात व्यावसायिक नाटकांचे प्रयोग अशा पध्दतीने सादर होताना दिसतात.

रंगमंच कामगार संघटनेच्या काही फार महत्वाच्या मागण्या आहेत. त्याचा विचार करु

- रंगमंच कामगाराला काम करताना मोठे अपघात होतात, तातडीचे उपचार करावे लागतात त्यासाठी परिषदेने एक ठराव मंजूर करावा व अशा रंगमंच कामगाराला 'म्युनिसिपालिटीच्या हॉस्पीटलमध्ये तातडीने मोफत उपचार करुन घेण्याची सुविधा असावी. त्यासाठी महापौरांना भेटून अशी व्यवस्था करावी.
- या रंगमंच कामगारांना स्वत:ची घरे नाहीत ते एकतर ट्रकमध्ये किंवा गोडाऊनमध्ये झोपतात.रंगमंच कामगार संघटनेच्या पदाधिक-यांनी असे सुचविले आहे की, गिरणगावात अनेक इमारती उभ्या रहाताहेत अशा इमारतीमध्ये रंगमंच कामगारांसाठी काही खोल्या राखीव ठेवाव्यात. त्यासाठी परिषदेने राज्यशासनाला भेटून ही सुविधा मिळवून द्यावी.
- परिषदेने जेष्ठा रंगमंच कामगारांना पेन्शन सुरु केली आहेच. त्यांच्याशिवाय अजून काही जेष्ठ कामगार आहेत पण ते आत वयोमानाने कष्टाचे काम करु शकत नाहीत. अशा कामगारांना शासनाकडून पेन्शन मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.अशी विनंती मी परिषदेला करतो.
- परिषदेतर्फे सर्वांचा सन्मान होतो तसाच सन्मान रंगमंच कामगारांचा व्हावा. कारण त्यांचे योगदान फार महत्वाचे आहे. त्यांच्याशिवाय प्रयोग उभा रहात नाही. निष्ठेने हे काम रंगमंच कामगार करीत असतो. रंगमंच कामगार संघटनेने अशा जेष्ठ कामगारांची दरवर्षी निवड करावी व १४ जून रोजी दरवर्षी आयोजित होणा-या कार्यक्रमात त्यांचा सन्मान करावा.
- रंगमंच कामगार संघटनेने अजून एक इच्छा दर्शविली आहे परिषदेच्या विषय नियामक मंडळात त्यांचा प्रतिनिधी आहे तसाच एक प्रतिनिधी परिषदेच्या कार्यकारणीवर असावा. परिषदेने याचा विचार करावा असे मी परिषदेला सुचवीन.

**प्रेक्षक :-**

रंगभूमीचे वर्तुळ प्रेक्षकांशिवाय पूर्ण होऊ शकतच नाही. पेक्षक हा तर फार महत्वाचा घटक. प्रयोग होतो तो भिन्न भिन्न अभिरुचीच्या प्रेक्षकांसाठी. सर्व समाजाची एकच अशी अभिरुची असत नाही, पण सध्याची वस्तुस्थिती अशी आहे की प्रेक्षकांना थोडा विरंगुळा हवा आहे. धकाधकीच्या व गतीमान आयुष्यात त्यांना थकवा घालविण्यासाठी थोडसे रिलॅक्स व्हायचे आहे आणि मानसशास्त्रीयदृष्टया ते योग्यही आहे. मग अशा विनोदी नाटकांनाच प्रेक्षक गर्दी करतात. प्रेक्षक गर्दी करतात म्हणून विनोदी नाटकांचा भडिमार होतो. हे दुष्ट चक्र आहे.

पण समाजात असाही काही टक्का प्रेक्षक आहे, ज्यांची बौध्दिक भूक आहे अशा प्रेक्षकांसाठी वैचारीक, समस्या प्रधान, चर्चा नाटक व जीवनातील अनेक अंगे दाखविणारी नाटके रंगमंचावर यायला हवीत. ती येतातही. आज विरंगुळाप्रधान नाटाकांची संख्या थोडी कमी झाली आहे व इतर उत्कृष्ट नाटाकांचे प्रयोग वाढत चालले आहेत. हा शुभशकुन आहे . आणि अशा नाटकांनाही प्रेक्षक गर्दी करताना दिसतात.

निर्माते नाटकांची प्रसिध्दीही फार खुबीने करतात. प्रेक्षकांना आकृष्ट करुन घेतात. वृत्त पत्रात अभिनेत्यांचे फोटो देऊन मोठमोठी जाहिरात करणे हा त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. प्रश्न पडतो एवढया मोठ मोठया जाहिराती देऊन प्रयोगाच्या जामखर्चाची तोंडमिळविणी कसे करत असतील ? जाहिरातीमध्ये मोठमोठया कलाकरांची प्रयोग आवडल्याची, समिक्षकांना प्रयोग आवडण्याची ओळ टाकूल प्रेक्षकांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न ही करतात. पण प्रेक्षकांनी असे दुस-याच्या मनाने जाणे याचा अर्थ प्रेक्षकांचा स्वत:च्या अभिरुचीवर विश्वास नाही असा होते. पूर्वी प्रेक्षक संस्थेचे नाव पाहून नाटक बघायला यायचा.आज सिलिब्रिटी कलाकारांची नावे पाहून येतो. अजून एक प्रेक्षकांची मानसिकता म्हणजे सर्व समिक्षकांनी स्तुतीसुमने वाहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाला विचार न करता येतो व समीक्षकाने थोडेसे अप्रिय लिहिले की प्रक्षेक त्या नाटकाचा विचारही करत नाही. तोंडातोंडी झालेली प्रसिध्दि प्रेक्षक मान्य करतो व प्रयोग पाहतो.

**नाटककार :-**

प्रयोगकलेच्या प्रवासात पहिला घटक म्हणजे नाटककार व त्यांनी लिहिलेली संहिता. संहिता ते प्रयोग हा सृजन प्रवास म्हणजे आत्मशोध. या आत्मशोधातील सर्व घटाकांची आजची स्थिती पहायला हवी. आज रंगभूमीवर पंन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग चालू आहेत. डॉ. राजीव नाईक यांनीा नाटकांचे प्रकार सांगितले आहेत-. सततची, आत्ताची आणि या दोहोंच्या आधली मधली आज रंगभूमीवर आताचीच नाटके अधिकांशाने दिसतात. आताच्या समस्या मांडणारी नातेसंबंधा विषयीची असे ढोबळ मनाने म्हणता येऊ शकते. सततची नाटकेही सादर होताहेत. त्यांची पुननिर्मिती होते आहे.

वि.वि शिरवाडकारांपासून ते शफाअत खान पर्यंतच्या नाटककारांनी मराठी रंगभूमीला समृध्द केले. आजचा एक नाटककार डॉ. विवेक बेळे ३.४ वर्षांनी एक सकस नाटक लिहितो. तो बहुप्रसवा नाही. तसेच सुरेश चिखले, संतोष पवार, संजय पवार, चिन्मय मांडलेकर, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, प्रशांत दळवी, राजीव नाईक, शफाअत खान सारखे नाटककार अजून लिहितच आहेत.

स्त्री नाटककारांमध्ये इरावती कर्णिक, मनस्विनी लता रविंद्र व सुषमा देशपांडे यांचा उल्लेख जरुर करायला हवा. डॉ. आनंद नाडकर्णी मानसशास्त्रज्ञ आहेत त्यांचीही मानसशास्त्रीय नाटके प्रयोगात आहेत. शिवाय धर्मकीर्ती सुमंत हा तरुण नाटककार नव्या सामाजिक विषयाला भिडतो आहे.

आजचे तरुण नाटककार जस जसे अनुभवाने समृध्द होत जातील तसतसे त्यांच्या नाटयकृतीत सकसपणा व विविधता येइल अशी आशा आहे. उद्याचे नाटककार फक्त शहरी विभागातून येणारे असतील असे नाही ते ग्रामीण भागातूनही येऊ शकतात. उदाहरण अगदी ताजे आहे, शिवाजी अंडरग्राऊंडचे.

ग्रामीण भागातील तरुणांना नाटयलेखनासाठी प्रवृत्त करावे लागेल. मार्गदर्शनही करावे लागेल. त्यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे. अशा तरुणांचा शोध घेऊन नाटयलेखन कार्यशाळा आम्ही घेणार आहोतच. आशा आहे की अशा प्रयत्नातून हा महत्वाचा घटक भावी रंगभूमीला मिळणार आहे.

**दिग्दर्शक:-**

या प्रयोगकलेचा सुकाणू म्हणजे दिग्दर्शक, दिग्दर्शकाला प्रयोगकलेचा अनुभव असायला हवा. अभ्यास केलेला असावा. आत्मविश्वास असायला हवा. दिग्दर्शकाला नटाकडून चांगला अभिनय करुन घ्यायची हातोटी असावी लागते. काही भडकणारे दिग्दर्शक पाहतो, काही समजावून देणारे दिग्दशर्क पाहतो. आज मराठीत पूर्णवेळ दिग्दर्शनाचे काम करणारे विजय केंकरे आणि मंगेश कदम यांच्यासारखे दिग्दर्शक आहेत. त्यांचे हे उपजीविकेचे एकमेव साधन आहे. निर्मात्याबरोबर झालेल्या करारातून जेवढी आर्थिक प्राप्ती असेल. तेवढयातच ते गुजराण करतात. रंगभूमीची नाळ तोडायची नाही असे त्यांना ठाम ठरविले आहे. या

दिग्दर्शकांचे मी अभिनंदन करतो. तरुण दिग्दर्शकांनीही असा दिग्दर्शकांचा आदर्श ठेवावा. फार कठिण आहे. थोडा धीर धरावा. स्वतःला establish करायला वेळ लागेल. पण एकदा का यशस्वी दिग्दर्शक म्हणून तुमची ओळख झाली की तुम्हीही नाटयदिग्दर्शन हा पूर्णवेळ व्यवसाय कराल. असे घडावे अशी मी इच्छा करतो.

**तंत्रज्ञ :-**

आज मराठी रंगभूमी वर जे प्रयोग सादर केले जातात त्यांचे दृश्यरुप आपण पाहिले तर नेपथ्यकारांनी नाटकाच्या आशयाचा, विषयाचा स्थळांचा विचार करुप नेपथ्याची रचना केलेली आढळेल. आज प्रदीप मुळ्ये हा असा नेपथ्यकार आहे तो सर्व निर्मात्यांना हवा असतो. असे चित्र भारतात इतरत्र कुठेही दिसत नाही. हा नेपथ्यकार नुसताच नेपथ्यकार नाही तर प्रकाशयोजनाकार वेशभूषाकार आणि दिग्दर्शक सुध्दा. आहे. नाटयमाध्यमाचा सखोल आणि सर्वांगिण विचार करणारा असा हा नेपथ्यकार मराठी रंगभूमीला लाभलाय. दुसरे अनेक नेपथ्यकार आणि प्रकाशयोजनाकार यांनाही विसरता येत नाही. जसा नेपथ्यकार रंगसंगतीचा विचार करतो तसाच विचार प्रकाशयोजनाकारही करतात. म्हणूनच मराठी रंगभूमीवर आज नाटयप्रयोगांचा दर्जा खूप उंचावला आहे.

**अभिनेता :-**

हा फार महत्वाचा घटक आहे. अभिनेत्यांमुळेच प्रयोग जीवंत होतो. आजच्या व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवरील बहुतांश अभिनेते आणि अभिनेत्रीची मानसिकता पाहिली की धसका बसतो. सतरा डगरींवर पाय ठेवणारे हे अभिनेते आहेत. अशांच्या बाबतीत मी म्हणेन, एखाद्या डगरीवरुन घसरलात तर कपाळमोक्ष होईल. ह्यातल्या काहींना असे वाटते की आपणाशिवाय नाटयप्रयोग होऊच शकणार नाही. असाा विचार करणा-या अभिनेत्यांना मी विचारतो की, बाबांनो तुमचे प्रेम कुणावर आहे ? रंगभूमीवर, नाटयसंस्थेवर की स्वतःवर ? असे आढळून येईल की हे असे अभिनेते स्वतः शिवाय दुसरा कुठलाच विचारच करत नाहीत. असे अभिनेते आणि अभिनेत्री रंगभूमीचा उपयोग करुन घेतात. नाटयसंस्थेला Steping Stone म्हणून वापरतात. निष्ठा बांधिलकी हे शब्द अशा कलाकारांना शून्य किंमतीचे. आज अशा कलाकरांना घेऊन नाटक करायचे म्हणजे भिंतीवर डोके आपटून घेण्यासारखे आहे. म्हणूनच की काय, निर्माते कमीत कमी पात्रांच्या नाटकांना प्राधान्य देतात.

काही व्यवासायिक नाटकात मात्र बरेच अभिनेते दिसतात पण निर्माते व अभिनेते यांनी मिळून प्रयोगाचे अयोजन केलेल पाहायला मिळते. तीन तीन महिने आधी वेळापत्रक तयात असल्यामुळे हे शक्य होतं.

शिवाय, व्यावसायिक नाटकासाठी अभिनेत्यांना प्रत्येक प्रयोगाचे मानधन मिळणार असते. असे घडताना प्रायोगिक रंगभूमीवर दिसत नाही . एकतर हे अभिनेते कुठल्या ना कुठल्या ऑफिसात नोकरी करीत असतात शनिवार, रविवार शिवाय ते प्रयोग करायला तयार नसतात. त्यामुळे एखाद्या यशस्वी प्रायोगिक नाटाकांचे दौरे होताना दिसत नाहीत.

काही वेळा ठरलेले प्रयोग असतानाही कोणी अभिनेता "मला शुटिंग आलय" म्हणून निर्मात्यांना तोंडघाशी पाडतात. रसिकहो, ही वस्तुस्थिती आहे. हे सगळ लक्षात घेऊन नवीन नाटकांच्या निर्मितीचा विचार करावा लागतो. किंवा नवीन अभिनेते आणि अभिनेत्री तयार करावे लागतात. कित्येकदा एका पात्रासाठी दोन कलावंत तयार करावे लागतात. तरी ही अधून मधून निर्मात्यांची गोची होतीच.

**समीक्षा :-**

पूर्वसुरींच्या संमेलनाध्यक्षांनी नाटय समीक्षेबद्दल नाराजी व्यक्त केलेली आढळते समीक्षकांवर त्यानंतर खूप तोंडसुख घेतलेले आहे. ते माझ्या वाचनात आले आहे. मला वाटते की कोणतीही समीक्षा करण्यासाठी एकच फुटपट्टी असत नाही, एकच Barometer असत नाही. त्यामुळे कलेची समीक्षा व्यक्तिसापेक्ष असते, समीक्षकांची अभिरुची, माध्यमाची जाण, अभ्यास, विचारांची बांधिलकी यातूनच समीक्षा लिहीली जाते. त्यामुळे एकाची समीक्षा किंवा परीक्षण दुस-या समीक्षकासारखे नसते. मराठी दैनिकातून दर आठवडयाला एका नाटकाची समीक्षा / परिक्षण येते म्हणजे वर्षात ५० च्या आसपास. पण रंगभूमीवर वर्षात ५० पेक्षा जास्त नाटकांची निर्मिते होते. म्हणजे वर्षभरातील सर्वच नाटकांची समीक्षा होत नाही. समीक्षक मग निवडक नाटकांचीच समीक्षा लिहितो. इतर नाटकांची दखल घेतली जात नाही. काही वेळा नाटक बंद पडता पडता समीक्षा लिहिलेली आढळेल. पूर्वीसारखे शुभारंभाच्या प्रयोगाना समिक्षक हजर असत नाहीत. त्यांना वेळ मिळेल तेव्हाच ते प्रयोग पाहतात.

समीक्षेचा नाटयप्रयोगावर परिणाम होतो का ? एखादा निर्माता चांगल्या परिक्षणाचा /समीक्षेचा अत्यंत कौशल्याने जाहीरात करुन प्रेक्षकांना नाटयप्रयोग बघण्यासाठी आकर्षित करतो. प्रयोगिक नाटकाची समीक्षा करताना काही समीक्षक जास्त कडक समीक्षा करतात. ते प्रायोगिक नाटकाचा दर्जा वाढावा या हेतूने पण हेतू चांगला असला तरी निर्मात्यांची अवस्था केविलवाणी होते. या कडक टीकेमुळे प्रेक्षक नाटकाच्या प्रयोगाकडे फिरकतच नाही. प्रेक्षकांची मानसिकता अशी आहे. यातून मार्ग काढण्यासाठी पूर्वी नाटयकलेला वाहिलेली मासिके, नियतकालिके प्रसिध्द होत होती- विनायक पडवळ, (भरतशास्त्र), सरोज तेलंग (नांदी) शिवाय शं. ना. अंधृटकर, अरुण नाईक यांनीही मासिके प्रसिध्द केली, पण ती बंद पडली. एन. सी. पी. ए. ने ही काही काळ मासिक प्रसिध्द केले पण तेही बंद पडले.

असे होऊ नये म्हणून कणकवली येथील वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान ही संस्था पुढे आली आहे. त्यांनी ण्क योजना आखली आहे. प्रत्येक रु.१,०००/- ची ठेव ठेवणारी ५०० सभासद त्यांना मिळाले की त्यावरील येणा-या व्याजावर ते मासिक चालवू शकतात. संपादक मंडळाची जुळवाजुळव चालू आहे. म्हणून या व्यासपीठावरुन मी रसिकांना आवाहन करतो की, आपण रु.१,०००/- च्या ठेवी संस्थेत ठेवा. तुमच्या ठेवी सुरक्षित राहतील व तुम्हाला दर महिन्याला हा अंक घरपोच मिळू शकेल.

शेवटी समीक्षकांच्या बाबतीत मी म्हणेन तुम्ही मुक्तपणे समीक्षा लिहा त्यातले चाांगले वाईट आम्ही समजून घेऊ . तुम्ही या रंगभूमीच्या व्यवहारातील एक भाग आहात. असे मी मानतो.

**विकेंद्रीकरण :-**

व्यावसायिक रंगभूमी मुंबईत केंद्रीत झाली तर प्रायोगिक रंगभूमी मुंबई व पुण्यात. पूर्वीसारखे आठवडेच्या आठवडे दौरे करणे निर्मात्यांना व स्थानिक संस्थांनाही आर्थिकदृष्टया परवडत नाही. त्यामुळे मुंबई-पुण्याबाहेर फारसे प्रयोग होऊ शकत नाहीत. मग ही नाटके महाराष्ट्राच्या कानाकोप-यात कशी पोहोचणार ?. प्रभाकर पणशिकर यांनी जसा अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला तसे आता शक्य दिसत नाही. यासाठी नाटय परिषद व आविष्कार यांनी एक प्रयोग करुन पाहिला, आमच्या 'दुर्गा झाली गौरी'च्या नृत्यनाटयाचे प्रयोग महाराष्ट्रात काही ठिकाणी करण्याचा प्रयत्न केला. जो सतत करत राहणेही न परवडणारे होते. म्हणून 'दुर्गा झाली गौरी'च्या Video व Audio Cassettes नाटयपरिषदेच्या शाखांना पाठविल्या. स्थानिक बाल कलाकारांना नृत्यांचे प्रशिक्षण देऊन Video Cassette प्रमाणे नृत्ये, नाटय स्थानिक दिग्दर्शकाने दिग्दर्शित करावे आणि याचे प्रयोग त्या त्या नाटयशाखेच्या परिघात सादर करावे. तसा प्रयोग आम्ही करुन पाहिला. प्रामाणिकपणे स्थानिक

कलाकारांनी मेहनत घेतली, पण मूळ दुर्गा झाला गौरीच्या प्रयोगाचा दर्जा मिळू शकला नाही. आम्ही प्रयोग विकेंद्रीकरणाचा प्रयोग म्हणून करुन पाहिला.

हा प्रयोग फसला तरी मी निराश नाही. नाटयपरिषदेकडे ती प्रस्ताव मांडतो की, त्या त्या वर्षाच्या उकृष्ट प्रोयोगिक नाटकाचे प्रयोग स्थानिक दिग्दर्शक व कलाकार यांच्याकडून करुन घ्यावेत आणि त्या त्या शाखेच्या परिघात याचे प्रयोग करावेत. म्हणजे त्या त्या शाखेत सृजनकार्य सुरु होईल. पुण्यातील यशस्वी प्रायोगिक नाटक तिथवर पोचणार नाही पण स्थानिक दिग्दर्शक व कलाकारांकरवी सादर होणारे प्रयोग तेथील प्रेक्षकांना पाहता येतील. परिषदेने तशी आर्थिक तरतूद करावी किंवा काही श्रीमंत शाखा आहेत त्यांच्याकडून त्यासाठी निधी जमवावा. परिषदेच्या उद्दीष्टामध्ये असा निधी जमवता येतो.

रंगभूमीवर सत्ता कुणाची ?

मध्यंतर या विषयाला तोंड फुटले होते. मला सत्ता हा शब्द खटकतो. सत्ता आली की राजकारण आले. एकमेकांवर कुरघोडी करणे आले, एकमेकांचे पाय ओढणे आले. सत्ता या शब्दा ऐवजी रंगभूमीवर महत्व कुणाला ? असे फारतर आपण म्हणू शकतो. मला असे वाटते की ही समहूकला आहे. प्रत्येक घटकाला यात तितकेच महत्व आहे. प्रत्येक घटकाचे कार्य काय आहे ? ते हवे तेवढेच होते आहे का ? संपूर्ण कला कृतीत ते बिघाड निर्माण करत नाहीना ? याचा विचार व्हावा.

कलाकृतीतील सर्व घटक जेव्हा एकजिनसी homogenious होतात तेव्हा ती कलाकृती उच्च दर्जा प्राप्त करते आणि एक सुविहित प्रयोग आपल्यासमोर सादर होतो.

संमेलनात यावर साधकबाधक चर्चा व्हावी हे अपेक्षित आहे.

**शासकिय अनुदाने :-**

आता महत्वाच्या विषयाकडे वळतो. महाराष्ट्र शासना तर्फे नाटयसंस्थाना निरनिराळया कारणांसाठी अनुदान दिले जाते.

संस्थांना अनुदान - रजिस्टर्ड नाटय संस्थाना किंवा सांस्कृतिक कार्य करणा-यांना असे अनुदान तीन वर्षांनी मंजूर होते. माझी सूचना आहे की महाराष्ट्रातील सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणा-या ज्या संस्थांनी अनुदानासाठी अर्ज केला असेल. अशा संस्थांचा गेल्या तीन वर्षाचा आर्थिक ताळेबंद व कार्याचे अहवाल पाहावे. ज्या संस्था सातत्याने कार्य करतात त्यांचा प्रथम विचार करावा आणि अशा संस्थांना एक वर्षा आड अनुदान मंजूर करावे. त्यामुळे अशा सातत्याने भरघोस कार्य करणा-या संस्थांचा आर्थिक भार कमी होईल व हे सातत्य टिकूल राहील.

प्रयोगांसाठी अनुदान - नांदेड येथील नाटयसंमेलनात अनुदान देण्याचा प्रस्ताव होता त्यावेळी मी प्रथम जाहिरपणे सांगितलं की, हे अनुदान प्रायोगिक नाटकांच्या प्रयोगांना मिळायला हवे. त्याची आवश्यकता प्रायोगिक नाटयसंस्थाना आहे. विजय केंकरे यांनीही व्यावसायिक नाटयप्रयोगांना अनुदानाची गरज नाही असा विचार मांडला.

आज आमचे म्हणणे मान्य झालं आहे आणि प्रायोगिक नाटयसंस्थांच्य प्रयोगाना अनुदान देण्याचा अध्यादेश निघाला आहे, पण त्यात ब-याच त्रुटी आहेत आणि तो बदलून घेणे आवश्य आहे. आज राष्ट्रीय पातळीवर दोन अंकी नाटकांपेक्षा सलग दीड ते पावणे दोन तासांची नाटके सादर होतात. हाच न्याय प्रायोगिक नाटकाला लावावा.

शासनाला नाटयव्यवसायाला आर्थिक हातभार लावायचा आहे. त्याबद्दल शासनाच्या सांस्कृतिक

खात्याचे आभार मानतो. जरी शासनाच्या योजना चांगल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होत नाही याची खंत आहे.

उदाहरण देतो - २५ प्रयोग केल्यानंतर अनुदानासाठी अर्ज केल्यावर ते लगेच मिळायला हवे. पण ते तसे घडत नाही. होते काय की, तुमच्या अर्जाची छाननी होण्यात काही माहिते जातात, त्यानंतर ती फाईल मंत्रालयात सांस्कृतिक खात्यात जाते, तिथून ती अर्थ खात्यात जाते व नंतर या फायलीचा परतीचा प्रवासा सुरु होतो. अशी तुमची फाईल लाल फितीच्या गुंडाळयात गुरफटली जाते. अन् सहा ते आठ महिने तुम्हाला अनुदान मिळत नाही. एका वर्षात ५० किंवा १०० प्रमाणे करायचे तर हे अनुदान वेळेवर मिळायला हवे. अर्थ संकल्पात ही योजना मंजूर झाल्यानंतर पुन्हा ही फाईल अर्थखात्याला का पाठविली जाते ? एकदा अर्थ संकल्पात याला मंजूरी मिळाल्यानंतर संचालक, सांस्कृतिक कार्य यांना कागदपत्रे पडताळून लगेच अनुदान देण्याचे अधिकार दिले पाहिजेत. पुन्हा अर्थखात्याकडून मंजूरी घेण्याची गरज नाही असे मला प्रामाणिकपणे वाटते.

प्रायोगिक नाटयसंस्थेची ५ प्रयोग करेपर्यंत दमछाक होते, पुढचे ५ प्रयोग केल्यावर अनुदान मिळणार आहे या आशेवर पुढचे ५ प्रयोग करतात. पण असे १० प्रयोग झाल्यानंतर अनुदानासाठी अर्ज केल्यावर वरील प्रमाणे ती फाईल लालफितीच्या गुंडाळयात अडकली तर ती अवस्था प्रायोगिक नाटयसंस्थेची होईल ते चित्र विदारक असेल. म्हणूनच अनुदानासाठी अर्ज केल्यावर सांस्कृतिक कार्य संचालकांना संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून लगेच ते मंजूर करण्याचा अधिकार दिला तरच ही योजना यशस्वी होईल. अन्यथा या योजनेच्या अपयशाची जबाबदार शासनाची असेल.

शासनाची अजून एक चांगला योजना जाहीर झाली आहे. मराठीतील जुन्या उत्कृष्ट व अभिजात नाटकांची निर्मिती करुन अशा नाटकांचे चित्रीकरण करुन ते एक सांस्कृतिक ठेवा म्हणून जतन करुन ठेवायचे. लवकरच ही योजना कार्यान्वित होईल.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने अनेक स्तरावर चांगले उपक्रम चालविले जातात. पण मला असे दिसून आले आहे की, यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयात कर्मचा-यांचा तुटवडा आहे. ६० साली सांस्कृतिक कार्य संचालनालयात जेवढया योजना कार्यान्वित होत्या त्याच्या अनेक पटीने आज योजना कार्यान्वित कराव्या लागतात. पण ६० साली जेवढा कर्मचारीवर्ग व जागा होती तेवढीच आजही आहे. मी सांगेन तुम्ही Job Evaluation करून बघा. आहे याच्या दुप्पट कर्मचा-यांची आवश्यकता आहे असे शासनाला दिसून येईल व आहे याच्या तिप्पट जागा यासाठी उपलब्ध करून द्यायला हवी तरच या सगळया योजना योग्यरीतीने कार्यान्वित करता येतील. व माझा विचार योग्य आहे असे शासनाला पटेलआणि त्याप्रमाणे शासन पाऊल उचलेल अशी मला भाबडी आशा आहे.

**राष्ट्रीय स्तरावर मराठी रंगभूमी :-**

आता शेवटी महत्वाचा प्रश्न महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळी भारताच्या राजधानीत महाराष्ट्र परिचय केंद्राची स्थापना झाली. उद्देश फार महत्वाचा होता. महाराष्ट्राची सर्व थरातील प्रगती देशाला कळावी. महाराष्ट्रातील सांस्कृतिक घडामोडींना राष्ट्रीय पातळीवर योग्य रीतीने प्रसिध्दी देण्यात यावी यासाठी दरवर्षी रंगभूमी दिनानिमित्त राजधानीत मराठी नाटकांचे महोत्सव भरवावेत १ मे या दिवशी महाराष्ट्र स्थापना दिवसाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे तसेच वसंत नाटय महोत्सव आयोजित करावा आणि राष्ट्रीय पातळीवर मराठीचा झेंडा फडकत ठेवावा.

मित्रांनो, यातला आज काहीही घडत नाही. महाराष्ट्र परिचय केंद्र हल्ली या बाबतीत काय करतेय कुणालाच ठाऊक नाही. २००० सालापासून हे महोत्सव बंद पडलेत. महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे कोणतेही सांस्कृतिक

कार्यक्रम आयोजित होत नाही.

शासनातर्फे नाही तर दिल्लीतील स्थानिक संस्था सार्वजनिक उत्सव समिती तर्फे हा रंगभूमी दिनाचा नाटय महोत्सव, १ मे रोजी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचे कार्यक्रम, गणपती उत्सव अशा सर्व कार्यक्रमांचे आयोजन करते. त्यासाठी पैशाची जमवाजमव करते. शासनाने करावयाचे काम ही संस्था करीत आहे. शासनाने रंगभूमी दिनानिमित्त हा नाटयमहोत्सव पुन्हा सुरु करावा म्हणून मी आणि सार्वजनिक उत्सव समीतीचे कार्याध्यक्ष श्री. रा. मो. हेजीब यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयाला मागच्या वर्षी म्हणजे २०१३ च्या जुलैमध्ये विनंती अर्ज केला की शासनाने या महोत्सवासाठी आर्थिक सहाय्य द्यावे. २०१३ साली ते शक्य झाले नाही पण २०१४ च्या रंगभूमी दिनानिमित्त आयोजित होणा-या नाटय महोत्सवासाठी अर्थसहाय्य देऊ असे आश्वासन आम्हाला मिळाले आहे.

रसिकहो, आपण मारे म्हणतो की आमची मराठी रंगभूमी देशात आघाडीवर आहे त्याचा अभिमान बाळगतो. पण प्रत्यक्ष राष्ट्रीय पातळीवर मराठीला कुणी विचारच करत नाही. दुर्दैवान मराठी सांस्कृतिक लॉबीच नाही.

राजनाधीन महाराष्ट्रातील ५० हून अधिक लोकप्रतिनिधी आहेत. यातील किती लोकप्रतिनिधींना मराठी कलेचे. नाटकाचे दिल्लीत होणा-या मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व कळत? मी २६ वेळा ३६ नाटकांचे प्रयोग दिल्लीत केले आहेत आणि मराठी रंगभूमीचा झेंडा भारताच्या राजधानीत फडकवत ठेवण्याचा प्रयत्न केला. दिल्लीत मराठी नाटकांचे प्रयोग याच निमित्ताने होतात. भारतरंगमहोत्सव आणि META अशा संस्थाही राष्ट्रीय पातळीवर महोत्सवाचे आयोजन करतात. त्यात मराठी नाटकाची निवड होते का? ही निवड केवळ तुम्ही पाठविलेल्या DVD पाहुन करतात. सुरुवातीला मी यावर आक्षेप घेतला होता. प्रयोग पाहून निवड करा. त्यासाठी प्रत्येक राज्यात निवड समीतिची स्थापना करा. पण तसे होताना दिसत नाही. दिल्लीत बोलबाला आहे ईशान्येकडील आणि दक्षिणेकडील नाटकांचा कारण या नाटकात दृश्यात्मकतेला जास्त महत्त्व दिले जाते. संहिता काही पानांचीच असते, पण त्याचे दृश्यरुप तुम्हाला खिळवून ठेवते. मराठी नाटकात शब्दाला महत्व पण हल्लीची नाटके दोन्हीचा चांगला समन्वय साधून सादर होतात, पण तरीही दिल्ली पर्यंत पोचत नाहीत.

साहित्यसंमेलनाध्यक्षांना वर्षभर अभ्यासदौ-यासाठी काही रक्कम दिली जाते. त्यात त्यांनी महाराष्ट्रभर फिरुन साहित्यिक उपक्रमांचा अभ्यास करावा आणि वर्षा अखेरच्या साहित्यसंमेलनाच्या वेळी अभ्यासाचा अहवाल व खर्चाचा हिशोब सादर करावा अशी योजना आहे.

अशाच प्रकारची योजना नाटयसंमेलनाध्यक्षासाठी असावी असे मला वाटते. विषय नियामक मंडळाच्या सभेत या योजनेला मंजूरी मिळवावी. सुरुवातीला मी परिवर्तनाच्या नांदी बद्दल बोललो. आता भरत वाक्य म्हणतो,

रंगभूमीवरुन आपण जेव्हा सृजनप्रवासाला निघतो तेव्हा आपण आत्मशोधाच्या प्रवासाला निघतो. अंगभूत प्रेरणातून आपल्याला प्रेक्षकांना काही दाखवायचे आहे, सांगायचं आहे। त्यांच्याशी रंगसंवाद साधायचा आहे. आपल्यातल्या ऊर्मीना आविष्कृत करायचे आहे, आणि अशा अविष्कारातून प्रेक्षकांना अंतमुर्ख करावयाचे आहे. आपला हा आत्मशोध शेवटच्या श्वासापर्यंत चालू असतो. माझ्याबाबतीत असेच घडणार आहे.

रसिकहो, माझ्या अल्पबुध्दीनुसार समग्र रंगभूमीच्या व्यावहारीक स्वरुपाचे मला जे आकलन झाले ते आपणासमोर मांडले. संमेलनात व संमेलनाबाहेरही यावर साधकबाधक चर्चा व्हावी ही अपेक्षा व्यक्त करुन आपली रजा घेतो.

**धन्यवाद !**